शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मास्टर ऑफ प्लॅनिंग या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी GATE प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र. २३५/तांशि-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०२ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:- १) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१९/प्र.क्र.४१/तांशि-४, दिनांक ४/६/२०१९
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No. T&AP/AIB-PCP/२०१६, दिनांक १८/७/२०१९
३) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम /२०१९/५९१, दिनांक २९.०७.२०१९

प्रस्तावना:

संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी संदर्भाधिन दिनांक ११/७/२०१९ च्या पत्रान्वये एम.प्लॅनिंग या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी प्रवेश नियमानुसार विहित करण्यात आलेल्या Common Entrance Exam for Design (CEED) अर्हता धारण करणा-या उमेदवारांनंतरही प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्यास त्या जागांवर गत शैक्षणिक वर्षाप्रमाणे संबंधित विषयातील GATE प्रवेश परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळवलेल्या उमेदवारांना पात्र ग्राहय धरण्यात येऊन वरील Planning /Architecture/Civil Engineering /Geography/ Economics / Social Science अभ्यासक्रमांच्या उमेदवारांमधून प्रवेश करण्यास परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन संचालक. तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधिन दिनांक २९/७/२०१९ च्या पत्राव्दारे शासनास प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास अनुसरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मास्टर ऑफ प्लॅनिंग या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी GATE प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक १८/७/२०१९ च्या पत्राव्दारे दिलेली मान्यता विचारात घेता मास्टर ऑफ प्लॅनिंग या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मूळ शैक्षणिक अर्हतेनुसार निर्धारित प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर **“नियोजन किंवा वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा भूगोल किंवा अर्थशास्त्र किंवा सामाजिक विज्ञान किंवा त्यास समतुल्य स्नातक पदवी**

परीक्षा किमान ५०% गुणांसह (मागास व दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५% गुणांसह) उत्तीर्ण केलेल्या आणि भारतीय प्रोद्योगिकी संस्थेव्दारे आयोजित डिझाईनमधील सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (CEED) नॉन-झिरो पॉझिटीव्ह प्राप्तांक धारण करणाऱ्या" पुरेशा उमेदवारांअभावी रिक्त राहणाऱ्या जागांवर **"नियोजन किंवा वास्तुशास्त्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा त्यास समतुल्य स्नातक पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह (मागास व दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५% गुणांसह) उत्तीर्ण केलेल्या आणि संबंधित विषयातील GATE प्रवेश परीक्षेमध्ये नॉन झिरो पॉझिटिव्ह प्राप्तांक मिळवलेल्या उमेदवारांना"** प्रवेशास पात्र ठरविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. एम.प्लॅनिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या नियमामध्ये यथावकाश सुधारणा करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८०२१७२५४२२००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=fcf7172a73579b34fa622983d8fb647780fbef1d35a1ca975955eb9193f3f800, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2019.08.03 15:06:44 +05'30'

(संजय औ. धारूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
३. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद-४३१ ००३
५. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग),नवी दिल्ली.
९. निवड नस्ती/तांशि-४